आर.सी.एस क्र.२१३/२०१२
सुर्यकांत वि. प्रकाश
नि.क्र.४१ चा भाग

**वादीतर्फे साक्षीदार क्र ०१ ची उलटतपासणी.**
देवाची शपथ खरे सांगतो

**नाव:-**सुर्यकांत हरिभाउ ढगे.

**<u>उर्वरित उलटतपास प्रतिवादी यांच्यातर्फे श्री जी.आर.हुंगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू</u>**

मी यापुर्वी नि.क्र.४५ वर दि.१७/१२/२००९ रोजीचे मृत्यूपत्र दाखल केले होते त्याची प्रमाणित प्रत मी दि.२५/०८/२०२५ रोजी दस्तऐवज यादीसोबत नि.क्र.८३ वर केलेली आहे. सदर दस्तऐवजाला यापुर्वीच नि.क्र.४५ देण्यात आला आहे परंतु नि.क्र.४५ मध्ये पुर्ण पेजेस दिसुन येत नसल्याने मी पुन्हा सदर नि.क्र.४५ ची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल करेल असे मागच्या तारखेला सांगितले होते त्याप्रमाणे मी सदर दि.क्र.४५ ची पुर्ण पेज असलेली प्रमाणित प्रत दाखल केली आहे. आता मला सदर प्रमाणित प्रत दाखविण्यात आली त्यामध्ये पुर्ण पेजेस आहे. नि.क्र.४५ मधील मजकूर व आजरोजी दाखल केलेली सदर नि.क्र.४५ ची पुर्ण पेज असलेली प्रमाणित प्रत यामधील मजकुर सारखाच आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यामुळे सदर प्रमाणित प्रतीला **नि.क्र.४५अ** देण्यात येत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.४५ ची प्रमाणित प्रत घेतेवेळी त्यामध्ये मृत्यपत्राचे संपुर्ण पेजेस देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या फायद्यासाठी माझ्या कामाचे असलेले पेज सदर नि.क्र.४५ मधुन काढुन घेतले होते. आता मला नि.क्र.४५ अ दाखविण्यात आला त्यावर दुय्यम निबंधक यांची सही व कार्यालयाचा शिक्का आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.०६/१०/२००८ रोजी माझ्या वडीलांनी माझ्यासोबत फोनवर काय संभाषण केले ते मी माझ्या शपथपत्रामध्ये नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील दि.०६/१०/२००८ रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या घरीच राहत होते. दि.०६/१०/२००८ रोजी माझ्या वडीलांची प्रकृती बरी नव्हती व त्यांना बुखार येउन उलट्या झाल्या होत्या. माझ्या वडीलांना बुखार येउन उलट्या झाल्या होत्या ही बाब माझ्या वडीलांनीच मला सांगितली होती. परंतु कधी सांगितली ती तारिख मला आठवत नाही. मी

माझ्या वडीलांची भेट घेण्याकरिता गेलो होतो. मी माझ्या वडीलांना दवाखाण्यात घेउन गेलो नव्हतो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यावेळी माझ्या वडीलांची तब्ब्येत थोडी बरी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६/१०/२००८ रोजी माझ्या वडीलांची प्रकृती चांगली होती.

हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश ढगे यांचे नाव ७/१२ वर चढले होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ते मला उशीरा कळले होते. माझ्या वडीलांनी जे घरमिळकतीचे बक्षीसपत्र करून दिले होते त्याबाबत मला माझ्या वडीलांचा मृत्यू झाल्यानंतर माहित झाले होते. माझे वडील सन २०१२ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की, घरमिळकतीचे बक्षिसपत्र माझ्या वडीलांनी त्यांच्या नातवाच्या नावावर करून दिले होते. आता मला नि.क्र.४४ वरिल बक्षीसपत्र दाखविण्यात आले ते तेच बक्षीसपत्र आहे. आता मला नि.क्र.४४ मधील मजकूर सदर बक्षीसपत्र हे हरिभाऊ आप्पाजी ढगे यांनी प्रमेय प्रकाश ढगे यांना करूण दिल्याचे नमुद आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदर बक्षीसपत्र माझ्यासमक्ष केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.४४ प्रमाणे हरिभाऊ आप्पाजी ढगे हे मालक असल्याचे नोंद आखिव पत्रिकेत नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४४ मधिल मालमत्ता ही हरिभाऊ आप्पाजी ढगे यांची स्वयंसंपादित मिळकत होती. आता मला नि.क्र.४४ दाखविण्यात आला त्यामधील आखिव पत्रिकेमध्ये हरिभाऊ आप्पाजी ढगे यांचे एकमेव मालक असल्याचे नाव आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदर मकान हे वारसांचे आहे. सदर मकान माझे आहे, प्रकश ढगे यांचे आहे व दोन बहिणींचे आहे. सदर मकाण हे अगोदर आजोबाच्या नावाने व आजोबा मयत झाल्यानंतर आजीच्या नावाने होते. नि.क्र.४४ वरिल मालमत्ता ही माझ्या आजोबाची असल्याबाबत तसा दस्तऐवज मी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

तसेच माझे आजोबा मयत झाल्यानंतर सदर नि.क्र.४४ मधिल मालमत्ता ही माझ्या आजीच्या नावावर चढली त्याबाबतची फेरफार पंजी मी अभिलेखावर दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४४ मधिल मिळकत ही हरिभाऊ ढगे यांच्या एकमेव मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा नि.क्र.४४ मधील मिळकतीचे मालक नसल्यामुळे मी दस्तऐवज दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी कागद दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातुन मजकुर नि.क्र.४४ मधील

घरमिळकत ही वडीलोपार्जित आहे हे खोटे लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, हरिभाऊ ढगे हे नि.क्र.४४ मधील मिळकतीचे एकमेव मालक असल्याने त्यांना बक्षीसपत्र करण्याचा अधिसकार होता. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४४ हे जे हरिभाऊ ढगे यांनी त्यांच्या नातवाच्या नावावर करून दिलेले आहे ते कायदेशीर आहे. नि.क्र.४४ वर बक्षीसपत्र लिहून देणा-याची व लिहून घेणा-याचीसुध्दा स्वाक्षरी आहे. हे मला माहित नाही की, नि.क्र.४४ वर साक्षदार म्हणुन श्री.भोयर व श्री.बेले यांच्या आहेत किंवा कसे. मी प्रमेय ढगे याला ओळखतो. सदर नि.क्र.४४ वर प्रमेय ढगे याचा फोटो आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला सदर फोटो स्पष्ट दिसत नाही. तसेच नि.क्र.४४ वर लिहून देणार म्हणुन हरिभाऊ आप्पाजी ढगे यांचा फोटो आहे. तसेच त्यांच्या फोटोच्या समोर त्यांची सही आहे.

**<u>प्रतिवादीच्या वकीलाच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास तहकूब.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि २५.०९.२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड